# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.05.2024** **वारःसोमवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात राज्यात पुण्यासह 11 मतदार संघांमध्ये मतदानाला सुरुवात
2. प्रशासनाकडून मतदारांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध
3. राज्यात पाचव्या टप्प्यातील निवडणुकीच्या प्रचाराला वेग आणि
4. राज्यात अनेक ठिकाणी कालही वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी

**<u>मतदान</u>**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातील मतदानाला सात वाजल्यापासून सुरुवात झाली आहे. पुणे, शिरुर, मावळ, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर आणि बीड या 11 मतदारसंघांचा यामध्ये समावेश असून एकंदर 29 हजार 284 मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया सुरू आहे. या टप्प्यात राज्यातल्या एकंदर 298 उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रांमध्ये बंद होणार आहे; त्यामध्ये केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, अमोल कोल्हे, शिवाजीराव आढळराव पाटील, सुजय विखे पाटील, अशा दिग्गजांचा समावेश आहे. मतदानाची वेळ संध्याकाळी सहा वाजेपर्यंत आहे. मतदान प्रक्रिया सुरळितपणे पार पडावी यासाठी सर्वच मतदारसंघामध्ये जय्यत तयारी करण्यात आली असून सर्व ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलीसांसह इतर सुरक्षा दलांच्या कर्मचाऱ्यांची पथकं नियुक्त केली आहेत. चौथ्या टप्प्यातील 11 लोकसभा मतदारसंघांमधील मतदानासाठी निवडणूक आयोगानं एकंदर 53 हजार 959 बॅलेट युनिट, 23 हजार 284 कंट्रोल युनिट आणि 23 हजार 284 व्हीव्हीपॅट मशीन उपलब्ध करून दिली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे.

पुणे शहर लोकसभा मतदार संघात प्रथमच लोकसभेची निवडणूक लढवणाऱ्या सर्वच उमेदवारांची आणि त्यांच्या राजकीय पक्षांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली आहे. गेल्या निवडणुकीत पुणे शहर लोकसभा मतदार संघात सर्वात कमी मतदान झालं होतं, मात्र यंदा प्रशासनानं मोठ्या प्रमाणावर मतदार जनजागृती मोहीम राबवली असून मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी अनेकविध उपाय योजना देखील करण्यात आल्या; त्यामुळे यावेळी पुण्यात किमान राज्याच्या सरासरीएवढे किंवा त्याहून जास्त मतदान होईल असा विश्वास स्थानिक प्रशासनानं व्यक्त केला आहे. पुणे जिल्ह्यात पात्र मतदारांची संख्या एकंदर 71 लाख 85 हजार आहे. वाढत्या उष्म्याबरोबरच गेल्या दोन ते तीन दिवसांपासून सुरु असलेल्या अवकाळी पावसाचा परिणाम मतदान प्रक्रियेवर होऊ नये यादृष्टीनं पुरेशी खबरदारी घेण्यात येत असल्याचं प्रशासनानं सांगितलं आहे. पुणे जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर मतदारांसाठी करण्यात आलेल्या विविध सोयी सुविधांबाबत पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी माहिती दिली......

**<u>पुरावे</u>**

ज्या मतदारांकडे मतदान ओळखपत्र नसेल त्यांना पासपोर्ट, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, आधार कार्ड, बँक किंवा टपाल विभागानं दिलेलं छायाचित्रासह पासबुक, यासह 12 पुराव्यापैकी कुठलाही एक दाखवून मतदान करता येईल

असं निवडणूक आयोगानं सांगितलं आहे. दरम्यान पुणे जिल्ह्यातल्या पुणे, मावळ आणि शिरुर लोकसभा मतदार संघातले सर्व आठवडे बाजार आज बंद ठेवावेत असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

**नवीन संकल्पना-जालना**

मतदान केंद्राध्यक्षांना मतदान केंद्रावर विविध महत्त्वपूर्ण कामांच्या नोंदी ठेवाव्या लागतात. या सर्व नोंदी व्यवस्थितपणे केल्या जाव्यात यासाठी जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी वेगळी संकल्पना राबवली आहे. ऐकूया त्याविषयी सविस्तर माहिती आमच्या प्रतिनिधीकडून........

**मतदान केंद्राध्यक्षांना मतदान केंद्रावर विविध महत्त्वपूर्ण कामांच्या नोंदी ठेवाव्या लागतात. यामध्ये मतदान पथकास सर्व साहित्य मिळालं का, मतदान यंत्रांची जोडणी झाली का, अभिरूप मतदान करून पाहिलं का, मतदान प्रक्रिया वेळेवर सुरु झाली का, आवश्यक सर्व अहवाल तयार केले का, अशा विविध माहितीसह सकाळी सात ते सायंकाळी सहापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यातील मतदानाची टक्केवारीही लेखी स्वरुपात नोंदवावी लागते. जालन्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या नोंदींसाठी वेगळी संकल्पना राबवली आहे. मतदान पथकाला दिलेल्या पिण्याचं पाणी थंड ठेवणाऱ्या बाटल्यांवर या सगळ्या नोंदी मार्करद्वारे करता येणार आहेत. त्यामुळे एकही मतदान प्रक्रियेतला कोणताही टप्पा सुटण्याची शक्यता नाही. जिल्हाधिकारी पांचाळ यांच्या या नवीन प्रयोगाचं भारत निवडणूक आयोगानेही कौतुक केलं आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, बाबा म्हस्के, जालना.**

**खर्गे सभा-धुळे**

राज्यात पाचव्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठीचा प्रचार सध्या जोरात सुरू आहे. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांची काल धुळ्यात इंडिया आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा झाली. भाजपाला 400 नव्हे तर देशभरातून 40 जागाही मिळणं अवघड असल्याचं खर्गे यावेळी म्हणाले. सध्या देशात सुरु असलेली लोकसभा निवडणूक लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी आहे असं ते म्हणाले. या सभेला प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, तसंच पक्षाचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. ही निवडणूक म्हणजे भारताचा आत्मा सुरक्षित ठेवण्यासाठीचा संघर्ष आहे. भाजपानं लोकशाही, संविधान धोक्यात आणलं आहे, असा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ नेते, शशी थरूर यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत केला.

**हकालपट्टी-नाशिक**

दरम्यान नाशिक जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांनी काल धुळे जिल्ह्यात झालेल्या प्रचाराच्या एका कार्यक्रमात भाजपात प्रवेश केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचं स्वागत केलं. डॉ. शेवाळे धुळे लोकसभा मतदार संघातून पक्षाची उमेदवारी मिळण्यासाठी इच्छूक होते. मात्र पक्षानं माजी मंत्री डॉ. शोभा बच्छाव यांना उमेदवारी दिली; त्यामुळे नाराज झालेल्या शेवाळे यांनी राजीनामा दिला होता.

**पियूष गोयल-उत्तर मुंबई**

उत्तर मुंबई लोकसभा मतदासंघातील महायुतीचे उमेदवार पीयूष गोयल यांच्या नमो यात्रेला काल मालाड इथल्या जरीमरी मंदिरापासून प्रारंभ झाला. त्यानंतर ढोलताशांच्या गजरात जन आशीर्वाद रथासह ही रॅली पटेलवाडी, शंकरवाडी, आयएनएस हमलामार्गे आक्सा गावात पोहोचली. यावेळी गावकऱ्यांनी पीयूष गोयल यांचं जोरदार स्वागत केलं. भाटी

कोळीवाडा इथं पीयूष गोयल यांनी कोळी बांधवांच्या समस्या जाणून घेतल्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लागू केलेल्या मत्स्य योजनेचा लाभ घेण्यास सांगितलं. वेनिला तलाव इथं प्रचार फेरीची सांगता झाली.

**पाऊस-लातूर**

राज्याच्या काही भागात कालही वादळी वाऱ्यासाह पाऊस पडला. लातूर जिल्ह्यातील निलंगा, औसा तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक भागात काही ठिकाणी विजेच्या तारा तुटून परिसरातील विद्युत पुरवठा खंडित झाला होता.

**नांदेड-पाऊस**

नांदेड शहरासह जिल्ह्यातील विविध भागात झालेल्या पावसामुळं फळपिकासह काढणीला आलेल्या उन्हाळी ज्वारी पिकाचंही मोठया प्रमाणात नुकसान झालं आहे. हदगाव तालुक्यातल्या एका शेतकऱ्याचा वीज पडून मृत्यू झाला. नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी पाच बैल आणि अन्य पशुधनही वीज पडून मृत्युमुखी पडलं आहे.

**बेमोसमी**

नाशिक जिल्ह्यात दोन दिवसात पावसामुळे जिल्ह्यात अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली असून वीज कोसळल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. सिन्नर तालुक्यात कृष्ण नगर इथं पावसामुळे एका घराची भिंत कोसळून एक महिला जखमी झाली आहे. चांदवड, नांदगाव तालुक्यात काही गावांमध्ये वीज आणि पावसामुळे जनावरं दगावली तसंच काही ठिकाणी घरांची पडझड झाली. सोलापूर जिल्ह्यात पावसामुळे गेल्या दोन दिवसापासून वातावरणातला उष्मा कमी झाला आहे.  सांगली जिल्ह्यात केळी पिकाच मोठं नुकसान झालं आहे. धाराशिव जिल्ह्यात उमरगा तालुक्यात पाच जनावरे दगावल्याच वृत्त आहे. तसंच आंबा कांदा यासह अनेक फळ बागा आणि पिकांचे या पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.